दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | सोमवार , 9 मार्च 2026 | | अंक क्र. 289 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

''आपल्या माणसांसाठी आपल्या चवीचं हॉटेल''

हॉटेल बालाजी

ब्रम्हवाडी फाटा, बीड रोड, परळी वै.



## टीम इंडिया तिसऱ्यांदा ठरली टी 20 चॅम्पियन

# भारत विश्वविजेता ! न्यूझीलंडचा 96 धावांनी धुव्वा





## आपल्याच देशात टी-20 विश्वचषक जिंकणाराही पहिला संघ; न्यूझीलंडचा संघ 159 धावांवर सर्वबाद

**मुंबई | वृत्तसंस्था**

गुजरातच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी स्टेडीयममध्ये झालेल्या आयसीसी टी 20 विश्वचषक 2026 स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडचा 96 धावांनी पराभव केला. तसेच, या स्पर्धेचे जेतेपद पुन्हा एकदा भारताकडेच ठेवण्यात सूर्याच्या टीम इंडियाला शक्य झाले आहे. अंतिम सामन्यात भारताच्या अभिषेक शर्मा, संजू सॅमसन आणि ईशान किशनने अर्धशतक झळकवत 255 धावांचा डोंगर उभा केला. याचा पाठलाग करताना न्यूझीलंडचा संघ हा 159 धावांवर सर्वबाद झाला. भारताच्या गोलंदाजांनी चांगली कामगिरी करत विजय सोपा केला. यावेळी, बुमरहाने सर्वाधिक 4 तर अक्षर पटेलने 3 विकेट्स घेतल्या.

### जसप्रीत बुमराहचा 'मॅजिक स्पेल' आणि किवींचे कंबरडे मोडले-

न्यूझीलंडचा डाव सावरण्याचा केविलवाणा प्रयत्न करणाऱ्या कर्णधार मिशेल सँटनरला 43 धावांवर बाद करत जसप्रीत बुमराहने भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. त्याआधी बुमराहने एकाच षटकात 2 चेंडूंवर 2 बळी घेत सामन्याचे पारडे पूर्णपणे भारताच्या बाजूने झुकवले होते. त्याने प्रथम घातक ठरू शकणाऱ्या जिमी नीशमला बाद केले आणि पुढच्याच चेंडूवर मॅट हेन्रीला तंबूचा रस्ता दाखवला. न्यूझीलंडची अवस्था 8 बाद 142 अशी झाली आणि संपूर्ण किवी संघ बुमराहच्या भेदक माऱ्यासमोर हतबल दिसला.

### मॅचचा टर्निंग पॉइंट आणि भारताचे वर्चस्व-

सामन्यात जेव्हा न्यूझीलंडची धावसंख्या 128 होती, तेव्हा डॅरिल मिशेल (17) इशान किशनच्या हाती झेल देऊन बाद झाला. हा या डावातील सर्वात मोठा टर्निंग पॉइंट ठरला आणि तिथूनच न्यूझीलंडचा पराभव निश्चित मानला जाऊ लागला. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना संजू सॅमसन, इशान किशन आणि अभिषेक शर्मा यांच्या तुफानी फटकेबाजीमुळे भारताने 20 षटकांत 255 धावांचा डोंगर उभा केला होता. 256 धावांचे हे विक्रमी लक्ष्य पार करणे न्यूझीलंडला जमले नाही आणि त्यांचे फलंदाज एकामागून एक बाद होत गेले.

### भारतीय संघांच्या नावावर हे विक्रम-

आयसीसी टी 20 विश्वचषकावर नाव कोरताच भारतीय संघ हा तिसऱ्यांदा टी-20 विश्वचषक विजेता बनणारा पहिला संघ ठरला आहे. तसेच, सलग दुसऱ्यांदा टी 20 विश्वचषक जिंकणारा पहिला संघ ठरला आणि आपल्याच देशात टी-20 विश्वचषक जिंकणाराही पहिला संघ ठरला आहे. त्यामुळे, हा विश्वचषक विजय भारतासाठी इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरणारा विजय ठरला आहे.

### असा झाला सामना-

भारतीय संघाने न्यूझीलंडसमोर 256 धावांचे लक्ष्य ठेवले होते. यावेळी, या धावांचा पाठलाग करण्यास आलेल्या टीम सायफर्ट आणि फिन एलन या जोडीने सावध पण चांगली सुरुवात केली. शिवम दुबेने एक झेल सोडत फिन एलनला शून्यावर जीवनदान दिले. पण, त्यानंतर अक्षर पटेलने त्याची विकेट काढत पहिला धक्का दिला. फिन एलन हा 9 धावांवर बाद झाला. त्यानंतर लगेचच जसप्रीत बुमराहने पहिल्याच चेंडूवर स्फोटक रचीन रवींद्रला बाद करत दुसरा मोठा धक्का दिला. इशान किशनने रचीनचा अप्रतिम झेल घेतला. त्याने एकच धाव केली होती. यानंतर अक्षर पटेलने आपल्या फिरकीची जादू दाखवत ग्लेन फिलिप्सला 5 धावांवर बाद केले. यावेळी, न्यूझीलंडची अवस्था 5 षटकात 3 बाद 47 अशी झाली होती.



# झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे यांच्या डॉक्टर कन्येचा शाही थाटात विवाह संपन्न

## बोडखे आणि विधाते या दोन परिवारांचे अनोखे मनोमिलन; डॉ.सत्यजित आणि डॉ.शिवानी विवाहबद्ध

**आष्टी (प्रतिनिधी)**

बीड जिल्ह्याच्या पत्रकारिता क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्त्व आणि 'दैनिक झुंजारनेता'चे उपसंपादक,ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांची कन्या डॉ.शिवानी आणि कडा येथील आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे (छत्रपती संभाजीनगर) माजी व्यवस्थापन परिषद सदस्य व अधिष्ठाता डॉ.हरिदास विधाते यांचे चिरंजीव डॉ. सत्यजित यांचा विवाह सोहळा आज रविवारी मान्यवरांच्या मांदियाळीत अत्यंत शाही थाटात संपन्न झाला.पत्रकारिता आणि शिक्षण क्षेत्रातील दोन प्रगल्भ विचारांच्या कुटुंबांचा हा ऋणानुबंध आष्टीकरांसाठी एक दिमाखदार सोहळा ठरला.

उच्चशिक्षित व संस्कारक्षम जोडी पत्रकारिता,शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात समाजाभिमुख कार्य करणाऱ्या बोडखे आणि विधाते परिवाराचा समाजात मोठा लौकिक आहे.बोडखे परिवारातील अत्यंत सालस व संस्कारसंपन्न कन्या डॉ.शिवानी यांनी 'एमबीबीएस'चे उच्च शिक्षण पूर्ण केले आहे; तर प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांचे चिरंजीव डॉ. सत्यजित हे वैद्यकीय क्षेत्रात 'एमडी मेडिसिन' हे पदव्युत्तर शिक्षण घेतलेले उच्चपदस्थ तज्ज्ञ आहेत. बुद्धिमत्ता आणि संस्कारांचा सुरेख संगम या विवाहानिमित्त पाहायला मिळाला.भारतीय विवाह विधींचे पावित्र्य आणि महत्त्व

भारतीय संस्कृतीत विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा करार नसून,ती दोन कुटुंबांची, विचारांची आणि मूल्यांची आयुष्यभराची गुंफण असते. 'सप्तपदी'मधील सात वचने ही जीवन जगण्याची आचारसंहिता आहे, तर 'मंगलाष्टकां'चे सूर हे भावी आयुष्यासाठी दिलेले सामूहिक आशीर्वाद असतात. अग्नीच्या साक्षीने घेतलेली शपथ आणि अक्षतांच्या रूपात पडणाऱ्या आशीर्वादांमुळे या नव्या नात्याला एक आत्मिक अधिष्ठान प्राप्त होते. आजच्या या आधुनिक युगातही बोडखे आणि विधाते परिवाराने या सर्व पारंपारिक आणि वैदिक विधींचे पावित्र्य जपत हा सोहळा अत्यंत भावपूर्ण वातावरणात पार पाडला.

### मान्यवरांची लक्षवेधी उपस्थिती

आष्टी येथील साईदत्त लॉन्स मंगल कार्यालयात पार पडलेल्या या शुभमंगल सोहळ्याला बीड, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगरसह राज्याच्या विविध भागांतून संत-महंत, राजकीय, सामाजिक, प्रशासकीय, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील दिग्गजांनी आवर्जून हजेरी लावली.

या विवाह सोहळ्यासाठी आ. सुरेश धस,माजी आ.भीमराव धोंडे, माजी आ. साहेबराव दरेकर, माजी आ. बाळासाहेब आजबे,देविदास धस, कुलगुरू ज्ञानदेव म्हस्के, सुभाष राऊत सेवानिवृत्त जिल्हाधिकारी सुनील चव्हाण,संपादक अजित दादा वरपे, सौ. आशाताई वरपे, ह.भ. प.राधाताई सानप, ह.भ.प.रणदिवे बापू,डॉ.संदीप गाडे,डॉ. मुकुंद विधाते,किशोर हंबर्डे,सतिष शिंदे,वाल्मिक निकाळजे, ह.भ.प.सोनाली दीदी करपे, ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल, निवृत्ती बोडखे महाराज, राऊत दादा महाराज,श्रीहरी पुरी महाराज, दादा महाराज चांगुने,निळकंठ महाराज तावरे,दिनकरराव तांदळे,मंदाताई घोगरे, डॉ.वाल्मीक सरोदे,माजी कुलगुरू एम बी गायकवाड,डॉ. नरेंद्र काळे डॉ. सतीश देशपांडे डॉ.एम.डी.जहागीरदार,डॉ.

अंकुश कदम,सतीश सुरवंशी, प्रा. चांदशीव, प्राचार्य भोसले प्राचार्य मजहर फारुकी प्राचार्य विजय भोसले सोपानराव निंभोरेप्रा.दत्तात्रय वाघ,एन एस राठी, अझरुद्दीन पुरुषोत्तम देशमुख प्रल्हाद लुलेकर नागनाथ शिंदे, कल्याणराव लगाने शिवाजीराव कदम ... उर्वरित पान २ वर



## भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे जागतिक महिला दिनानिमित्त सन्मानित

परळी : स्व. सौ. वंदना पारसेवार सामाजिक प्रतिष्ठान परळी वै. व व्यापारी असोसिएशनचे उपाध्यक्ष श्री नागनाथजी पारसेवार यांच्या 61 एकसष्ठी प्रित्यर्थ जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून परळीतील कर्तत्वान महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री ब्रिजलालजी मुंदडा व प्रमुख पाहुणे म्हणून आर्यवैश्य समाज विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष आदरणीय श्री विकासरावजी डूबे, ज्यांनी हा कार्यक्रम घडवून आणला असे 61 पूर्ती सोहळ्याची उत्सव मूर्ती आदरणीय श्री नागनाथजी पारसेवार, प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेश कौलवार, पतंजली प्रमुख सरलाभाभी उपाध्याय हे उपस्थित होते.



सामाजिक,राजकिय कार्यात सक्रिय राहुन कार्य करत असलेल्या भाजपाच्या शहरअध्यक्ष सौ.उमामाताई समशेट्टे या अनेक वर्षापासून भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. दोन वेळा नगरसेविका म्हणून कार्य केलेले आहे. बीड जिल्ह्याच्या नियोजन समितीच्या सदस्या म्हणून तसेच वीरशैव महासभेच्या जिल्हा अध्यक्ष म्हणून काम करत असताना त्यांनी अनेक निराधार मुलांना शिक्षणासाठी दत्तक घेऊन त्यांच्या पायावर उभे केले आहे.महिलांसाठी रोजगार उपलब्ध व्हावा,महिला सक्षम व्हाव्यात म्हणून अनेक कार्यशाळा घेतल्या.त्यांच्या या कार्याची स्व. सौ.वंदना नागनाथ पारसेवार सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने व मान्यवरांच्या उपस्थितीत जागतिक महिला दिनानिमित्त दि.८ मार्च रोजी सन्मान करण्यात आला. यावेळी भाजपचा शहराध्यक्ष सौ .उमाताई समशेट्टी यांनी स्व.वंदनाताई यांच्या कार्याची आठवण करून दिली. तसेच श्री नागनाथजी पारसेवार यांचा विविध संस्थांच्या वतीने 61 वा वाढदिवस उत्साहाने साजरा करण्यात आला.

पंचम ज्योतिर्लिंग महाप्रभू वैद्यनाथ नगरी श्री क्षेत्र परळी वैजनाथ येथे येणाऱ्या भाविकांना ... उर्वरित पान २ वर

## रेणापूर येथील सा.बां. उपविभागाच्या अद्यावत इमारतीसाठी २ कोटी मंजूर

### भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिलेली माहिती



लातूर : रेणापूर येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या नवीन अद्यावत कार्यालय इमारत बांधकामासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात १ कोटी ९३ लक्ष ५५ हजार रुपयाची मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत विविध कामांना गती मिळावी सदरील विभागाच्या कार्यालयाची इमारत अद्यावत सुसज्ज व्हावी यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस आणि जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी अर्थसंकल्प सादर करताना रेणापूर येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या कार्यालय इमारत नव्याने बांधकाम करण्यासाठी १ कोटी ९३ लाखाची तरतूद केली असल्याचे जाहीर केले.

रेणापूर येथे सध्या असलेली सार्वजनिक बांधकाम उपविभागाची दोन मजली इमारत अत्यंत जीर्ण झाली असून अर्थसंकल्पात मंजूर झालेल्या १ कोटी ९३ लक्ष ५५ हजार रुपये खर्चाच्या नव्याने बांधण्यात येणाऱ्या इमारतीत उपविभागीय अधिकारी यांचे कक्ष, शाखा अभियंता यांचे कक्ष, कार्यालयीन कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात येणार असून सर्व सोयीनेयुक्त अशी एक मजली भव्य वास्तू उभारण्यात येईल अशी ही माहिती आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

## वकील काय म्हणतो त्याला मी किंमत देत नाही

### सिरसाळा पोलीस ठाण्याच्या एपीआयचा व्हिडिओ व्हायरल; वकील संघ संतप्त

### वक्तव्यावरून जिल्हाभरात चर्चा; परळी वकील संघाची उद्या तातडीची बैठक

**सिरसाळा | प्रतिनिधी**

सिरसाळा पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) यांनी नागरिकांशी संवाद साधताना वकिलांबाबत केलेल्या वक्तव्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून त्यावरून वाद निर्माण झाला आहे. या व्हिडिओमधील विधानांमुळे वकील बांधवांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

व्हायरल व्हिडिओमध्ये संबंधित अधिकारी नागरिकांशी बोलताना “वकील काय म्हणतो त्याला मी किंमत देत नाही. कोर्टाचा आदेश जसा असेल तोच महत्त्वाचा आहे; वकील म्हणजे कोर्ट नाही,” असे म्हणताना दिसत आहेत. तसेच “वकिलाला पैसे दिले की तो तुमच्याच बाजूने बोलणार,” अशा आशयाचे वक्तव्यही त्यांनी केल्याचे व्हिडिओत दिसत आहे.

या वक्तव्यामुळे वकिलांच्या व्यावसायिक प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याचा आरोप वकील बांधवांकडून केला जात आहे. कायद्याच्या क्षेत्रात काम करणाऱ्या वकिलांबाबत अशा प्रकारची सार्वजनिक टिप्पणी करणे अयोग्य असल्याची प्रतिक्रिया अनेक वकिलांनी व्यक्त केली आहे. सोशल मीडियावरही या व्हिडिओवर विविध प्रतिक्रिया उमटत असून काहींनी संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर परळी वकील संघाची उद्या तातडीची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत पुढील भूमिका निश्चित करून अधिकृत निर्णय जाहीर केला जाणार असल्याची माहिती परळी वकील संघाचे अनेक विधिज्ञ यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला आहे.

या प्रकरणामुळे परळी तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातील वकील बांधवांचे लक्ष या घडामोडीकडे लागले असून पुढे प्रशासन आणि वकील संघटना याबाबत नेमकी कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# इनोव्हिजन लिमिटेडचा आयपीओ 10 मार्च 2026 रोजी सुरु होणार

इनोव्हिजन लि. ने त्याच्या पहिल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरसाठी प्रत्येकी ₹10 दर्शनी मूल्याच्या प्रति इक्विटी शेअरची किंमत ₹५२१ ते रु. ५४८ प्रति इक्विटी शेअरनिश्चित केली आहे.

कंपनीची इनिशियल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ किंवा इश्यू) मंगळवार, 10 मार्च 2026 रोजी सबस्क्रिप्शनसाठी उघडेल आणि गुरुवारी, 12 मार्च 2026 रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान 27 इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर 27 इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात. या तारखेपर्यंत 10 रुपये दर्शनी मूल्याचे 18,900,000 इक्विटी शेअर्स असून आयपीओ

हा रु. 2,550.00 दशलक्षचा नवीन इश्यू आहे आणि प्रवर्तक विक्री करणाऱ्या भागधारकांद्वारे - लेफ्टनंट कर्नल रणदीप हुंडल आणि उदय पाल सिंग यांनी 1,238,000 समभागांसाठी ऑफर-फर-सेल आहे.ताज्या इश्यूपासून रु. 510.00 दशलक्ष रकमेपर्यंतची रक्कम कंपनीने घेतलेल्या सर्व किंवा काही उधारीच्या अंशतः किंवा पूर्णतः परतफेड किंवा पूर्व-पेमेंटसाठी, कंपनीच्या खेळत्या भांडवलाच्या गरजा आणि सामान्य कॉर्पोरेट उद्देशांसाठी निधी देण्यासाठी रु. 1,190.00 दशलक्ष असेल.कंपनी भारतभरातील आपल्या ग्राहकांना मनुष्यबळ सेवा, टोल प्लाझा व्यवस्थापन आणि कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करण्याच्या व्यवसायात आहे.



# शिक्षक सक्षमीकरणासाठी भारती एअरटेल फाउंडेशनचा एआय एकत्रीकरण उपक्रम




भारताच्या शिक्षण परिसंस्थेत AI चा स्वीकार वेगाने वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, भारती एअरटेल फाउंडेशनने जागतिक स्तरावरील ना-नफा संस्थेच्या CK 12 फाउंडेशनसोबत भागीदारी केली आहे. या भागीदारीअंतर्गत,K12 स्तरावरील सर्व शिक्षकांसाठी 45 पेक्षा अधिक AIसक्षम अध्यापन साधनांचे TheTeacherApp मध्ये एकत्रीकरण करण्यात आले आहे. सध्या देशभरातील 2 लाखांहून अधिक शिक्षक वापरत असलेले TheTeacherApp हे आयुष्यभर मोफत असलेले डिजिटल शिक्षण व्यासपीठ आहे. वर्गखोलीतील प्रत्यक्ष गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेले AIसक्षम TheTeacherApp शिक्षकांच्या दैनंदिन अध्यापन प्रक्रियेला पाठबळ देत, वेळ वाचवणे, अध्यापन अधिक प्रभावी करणे आणि भारताच्या विकसित होत असलेल्या शिक्षण व्यवस्थेशी सुसंगत, सुरक्षित व संदर्भानुरूप साधनांद्वारे विविध अध्यापन गरजांना प्रतिसाद देणे शक्य करते.राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 आणि विकसित भारत 2047 या दृष्टीकोनावर आधारित ही भागीदारी शिक्षकांसाठी केवळ डिजिटल प्रवेशापासून अर्थपूर्ण डिजिटल सहभागाकडे वाटचाल दर्शवते.TheTeacherApp दीर्घकाळापासून प्रशिक्षण व शिक्षण संसाधनांच्या माध्यमातून शिक्षकांना पाठबळ देत आहे. त्याच्या नव्या AI-सक्षम आवृत्तीत अध्यापन कार्यप्रवाहात थेट सहाय्यक स्तर समाविष्ट करण्यात आला आहे.

# एअरटेलची पेमेंट्स बँक रुपे कार्डसाठी बॅलन्स अपडेट सेवा

Payments Bank₹

एअरटेल पेमेंट्स बँकेने आपल्या एनसीएमसी एनेबल्ड रुपे ऑन-द-गो कार्डांसाठीच्या तत्काळ एनएफसी-बेस्ड बॅलन्स अपडेट सुविधेची घोषणा केली. ग्राहक आता त्यांच्या एनएफसी-पॉवर्ड अँड्रॉइड स्मार्टफोन्सवरील कार्ड सहजपणे टॅप करून तत्काळ कार्डावरील उर्वरित रक्कम तपासू शकतील किंवा ती अद्ययावत करू शकतील. त्यामुळे मेट्रो स्थानकावरील किऑस्कमध्ये जाण्याची गरज भासणार नाही आणि विनासायास, पूर्णपणे डिजिटल व संपर्करहित प्रवासाचा अनुभव मिळेल. वास्तव जगातील वापराची माहिती तसेच ग्राहकांच्या प्रतिक्रिया जमवण्यासाठी एअरटेल पेमेंट्स बँकेने काही महिन्यांपूर्वी ही सुविधा प्रयोग म्हणून सादर केली होती. प्रायोगिक स्तरावर या सुविधेला चांगली स्वीकृती आणि ग्राहकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला, त्यामुळे या सुविधेची दैनंदिन प्रवाशांसाठी असणारी उपयुक्तता सिद्ध झाली. या सकारात्मक प्रतिसादामुळे बँक आता ही सुविधा रुपे ऑन-द-गो कार्डाच्या सर्व वापरकर्त्यांसाठी सुरू करत आहे.

या सुविधेत सुधारणा झाल्यामुळे प्रवासी आता त्यांच्या बँकखात्यामध्ये किंवा एअरटेल थँक्स ॲपवरील वॉलेटमध्ये लॉगइन करून लिंक्ड एनएफसी-एनेबल्ड अँड्रॉइड स्मार्टफोनद्वारे तत्काळ (रिअल टाइम) कार्ड बॅलन्स तपासू शकतात किंवा ते अद्ययावत करू शकतात



# होळीच्या सणाचा आस्वाद देणारे कॅफे अकासाचे उत्सवी पक्वान्न

कॅफे अकासा, अकासा एअरची ऑनबोर्ड मील सर्व्हिस प्रस्तुत करत आहे होळी स्पेशल मीलची चौथी आवृत्ती, जिथे रंगीबेरंगी होळीची मजा आणि स्वादिष्ट फ्लेवर्स मिळतात. भारतभर आवडीने खाल्ल्या जाणाऱ्या पारंपरिक होळीच्या पदार्थांपासून प्रेरित ही खास ऑफर आहे ज्यात स्वादिष्ट क्लब कचोरी सोबत मसालेदार दम आलू, सोबत थंडाई गुजियाची जोड आणि आपल्या पसंतीचा एक बिव्हरेज असा भन्नाट मेन्यू दिला आहे. हे खास मील 1 मार्च ते 31 मार्च 2026 पर्यंत उपलब्ध आहे आणि तुम्ही www.akasaair.com किंवा अकासा एअर मोबाइल ॲप वरून प्री-बुक करू शकता. होळी म्हणजे एकत्र येणं, आनंद आणि सेलिब्रेशनची खरी मजा आणि हाच उत्साह या खास मीलमधून अनुभवायला मिळतो, खारट-चटपटीत आणि गोड अशा फ्लेवर्सचा सुंदर मेळ घालत हा फेस्टिव्ह ट्रीट सणाची खरी चव पकडतो. पारंपरिक होळी फेव्हरेट्समधून प्रेरणा घेत, अकासा एअर ने प्रवास अधिक खास आणि पर्सनल वाटावा यासाठी सीझनल टच दिला आहे, त्यामुळे फ्लाइंगचा अनुभवही सणासुदीसारखाच खास आणि आनंददायी बनतो. कॅफे अकासा चा नेहमी अपडेट होणारा मेन्यू खास विचारपूर्वक तयार केला जातो, ज्यात विविध प्रकारचे गॉरमेट मील्स, चविष्ट स्नॅक्स आणि रिफ्रेशिंग बिव्हरेजेसचा समावेश आहे, ज्यामुळे प्रत्येकाच्या टेस्ट आणि डाएट प्राधान्याला साजेसा पर्याय मिळतो.

संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे

पान १ वरुन

## झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे यांच्या डॉक्टर कन्येचा शाही थाटात विवाह संपन्न

मेजर बनसोडेजाधव गुरुजी, हनुमंत थोरवे, मेहबूब शेख, बाबूशेठ भंडारी, ॲड.साहेबराव म्हस्के,नियामत बेग, अजय धोंडे,अभय धोंडे,रमजान तांबोळी, नगराध्यक्ष जिया बेग, डॉ.अमेय डोके,संतोष शेठ मेहेर,राजेंद्र ताठे, आदित्य ताठे, ज्येष्ठ पत्रकार अनंत हंबर्डे,अण्णासाहेब चौधरी, शिवाजी राऊत, दत्ताभाऊ काकडे, प्रा. एस.ए. सोमवंशी, एस.ए. बनसोडे,डॉ. दर्शना बारवकर,मनीषा चवरे,सौ.विद्या चव्हाण,संतोष भैय्या चव्हाण,डॉ. डी.बी. राऊत उपस्थित होते. शैक्षणिक क्षेत्रातील प्राचार्य डॉ.सतीशचंद्र सूर्यवंशी (श्रीगोंदा), प्राचार्य डॉ. जयसिंगराव भोर, प्राचार्य डॉ.सोपान निंबोरे,प्राचार्य दत्तात्रय वाघ, प्राचार्य डॉ. खेमनर यांच्यासह सुनील नाथ, युवराज पाटील, अनिल ढोबळे, धैर्यशील थोरवे, डॉ.महेश नाथ, संजय ढोबळे, डॉ. अशोक गांधी, डॉ. सचिन टेकाडे, रामशेठ मधुरकर, सावता ससाणे, बाळासाहेब भुकन, यशवंत खंडागळे, राजेंद्र धोंडे, अशोक साळवे, ॲड. बाबुराव अनारसे, उपसभापती नामदेव धोंडे, परिवंत गायकवाड, दिलीप बन्सोडे, प्रल्हाद खेतमाळस, राम बन्सोडे, विजयशेठ मेहेर, नायब तहसीलदार भगीरथ धारक, नामदेव राऊत, विठ्ठलराव बन्सोडे, विक्रम पोकळे, पोपट घुले, ॲड. रत्नदीप निकाळजे, सीताराम पोकळे, प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, सतीशमामा झगडे, बाळासाहेब वाघुले, दिलीप काळे, नगराध्यक्ष जिया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, रंगाण्णा धोंडे, राजेंद्र काळे, अभय शिंदे, सुरेश वारंगुळे, सुनील म्हेत्रे, संदीप सुंबरे, अरुण सायकड, राजेंद्र लाड,विनोद ढोबळे, मुस्ताक शेख, राजेश राऊत, रघुनाथ कर्डीले, प्रवीण पोकळे, अविनाश कदम आणि परिसरातील सर्व पत्रकार बांधव, संपतराव धोंडे,शेख अन्सारभाई, डॉ. उत्तम शिंदे, दादा झांजे, दवा गव्हाणे, डॉ.राहुल घाटूळ (परभणी), बाळासाहेब शिंदे, बन्शीभाऊ पोकळे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी अध्यात्मिक क्षेत्रातील ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल,ह.भ.प.आजिनाथ अंधाळे महाराज,माजी शिक्षणाधिकारी ह.भ.प.पांडुरंग जाधव गुरुजी,ह.भ.प.मंदारबुवा, ह.भ.प.राऊत दादा महाराज, निळकंठ तावरे महाराज, संतोष मोरे,राजेंद्र लोखंडे महाराज, निवृत्तीदादा बोडखे महाराज, आप्पासाहेब सुंबरे महाराज, दादा महाराज चांगुणे यांनी नवदाम्पत्याला आशीर्वाद दिले.

या दिमाखदार सोहळ्याचे खुमासदार सूत्रसंचालन निलेश दिवटे यांनी केले. तर उपस्थित सर्व मान्यवर व स्नेहीजनांचे आभार प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांनी मानले.

संस्कारसंपन्न परिवाराला संत-सज्जनांचे आशीर्वाद!रविवारी साईदत्त लॉन्समध्ये संपन्न झालेल्या बोडखे आणि विधाते परिवाराच्या या विवाह सोहळ्याला विविध क्षेत्रांत नावलौकिक प्राप्त असलेल्या मान्यवरांची आवर्जून उपस्थिती होती.समाज प्रबोधनासाठी लेखणी झिजवणारे पत्रकार उत्तम बोडखे आणि ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारे प्राचार्य डॉ.हरिदास विधाते,या दोन्ही कुटुंबांनी सातत्याने समाजासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या याच सामाजिक कर्तव्याची पावती म्हणून राजकीय,प्रशासकीय आणि धार्मिक क्षेत्रातील गुणीजनांनी या विवाह सोहळ्याला उपस्थित राहून कौटुंबिक स्नेहाचे नाते अधिक घट्ट केले.उपस्थितांनी दोन्ही परिवारांच्या आणि नवदाम्पत्याच्या भविष्यातील यशदायी वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या.उपस्थित मान्यवरांचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते आणि उत्तम बोडखे यांनी आभार मानले.

## भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे...

त्यांच्या प्रवासाच्या सोयीसाठी रेल्वेची वेळ समजण्यासाठी प्रतिष्ठानच्या वतीने रेल्वे वेळापत्रकाचे व्यास पिठावरील मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. रेल्वे वेळापत्रक गणपती मंदिराच्या भिंतीवर लावण्यात आले.

यावेळी परळी नगरीच्या नगराध्यक्ष सौ पद्मश्री धर्माधिकारी, सौ. सविता देवशटवार यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास जिजामाता गार्डन सदस्य वैद्यनाथ बँकेचे माजी चेअरमन विकासराव डुबे, अभयकुमार ठक्कर, चैनसुख जाजू, सुभाष तोतला, बंडूशेठ गरुड, रेपे साहेब, गुलाबराव शेटे, सोळंके सर, काकांनी सर, चंद्रकांत मुंडे, आंबेकर साहेब, वंदना प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेश कौलवार, लक्ष्मीकांत चौलवार, विनोद कौलवार, प्रकाश चिद्रेवार, विवेक पारसेवार, सुनील गडम, सरला उपाध्याय, अर्चना रुद्रावार, छाया बुरांडे, सुजाता गडम, शारदा धुमाळ, नंदा पारसेवार, शालिनी बोधे, आधी उपस्थित होते.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# महसुल प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि गतीमान करण्याच्या उद्देशाने महाराजस्व समाधान शिबीर

## – अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे


**सिरसाळा(अतुल बडे)**

महसुल प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि गतीमान करण्याच्या उद्देशाने महाराजस्व समाधान शिबीर कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचे अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे यांनी म्हटले आहे. त्या सिरसाळ्यातील महसुल प्रशासन आयोजित

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर कार्यक्रमात बोलत होत्या,मोठ्या थाटात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे उदघाटन संपन्न झाले. उदघाटन प्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे यांच्या सोबत परळी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर,नायब तहसीलदार परवीन पठाण मॅडम,नायब तहसीलदार सुरवसे उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली,

शेतकरी,मजुर,दिव्यांगांनी घेतला ह्या शिबिरात योजनांची माहिती व लाभ घेतला. महसुल प्रशासनाचे विविध विभागाचे स्टॉल या ठिकाणी लावण्यात आले होते. ह्या स्टॉल माध्यमातून योजनांची माहिती व महसुल संबंधित लोकांचे विविध योजनेतील प्रलंबित कामांचा निपटारा करण्यात आला ,

महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख व गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले आहे असे अप्पर जिल्हा धिकारी सोनवणे यांनी म्हटले आहे. ७ मार्च ते १५ मे दरम्यान अभियानाचे परळी वैजनाथ तालुक्यात मंडळस्तरावर शिबिराचे आयोजित करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसूलविषयक तक्रारींचे तत्काळ निवारण करण्यावर या उपक्रमाचा भर राहणार आहे. असे अप्पर जिल्हाधिकारी सोनवणे यांनी म्हटले आहे तर ज्या त्या मंडळातील



या शिबीराचा नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी केले. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या सुचनेनुसार परळी वैजनाथ तालुक्यात मंडळनिहाय छत्रपती शिवाजी महाराज महाराज स्व समाधान शिबिर अभियान राबविण्यात येणार आहे. अभियान या शिबिरांमध्ये नागरिकांना खालीलप्रमाणे महत्त्वाच्या सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या शिबिरांच्या माध्यमातून दाखले वाटप, विद्यार्थ्यांसाठी शाळा/कॉलेज प्रवेशासाठी आवश्यक दाखले दिले जातील. लोकसेवा हक्क कायद्यानुसार प्रलंबित अर्ज निकाली काढून तसेच पूर्वी प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने प्राप्त वितरण करणे,७/१२ अद्ययावत करणेः प्रलंबित व विवादास्पद फेरफार निकाली काढणे, जिवंत ६/१२, मोहीमांतर्गत अद्ययावत ७/१२ चे वाटप आणि फेरफार नोंदी दुरुस्त केल्या जातील., जमिनी संबंधित प्रकरणेः भोगवटादार वर्ग-१ जमीन वर्ग-२ मध्ये परावर्तित करणे, अकृषिक सुधारणा कायद्यानुसार गरजीनुसार करणे, तुकडेबंदी कायद्यान्वये फेरफार आणि अकृषिक परवानी नोंदी अद्ययावत केल्या जातील., सामाजिक अर्थसहाय्यः विविध शासकीय योजनांच्या पात्र लाभार्थ्यांना मंजुरी,आदेशाचे वाटप करण्यात येइल. सिरसाळ्यात झालेल्या शिबीर मध्ये अनेक लाभार्थ्यांना शासकीय योजना,कागदपत्रे/प्रमाणपत्रे विना खर्च लाभ झाला. कार्यक्रमास मंडळ अधिकारी गुडदे,तलाठी पंडित,ग्रामसेवक अब्दुल शेख,सरपंच सोहेल पठाण,फिरोज पठाण,माजी सरपंच वैजनाथ देशमुख , सेवानिवृत्त तहसीलदार रुपनर उपस्थित होते. ह्या शिबीरात

डिजिटल ७/१२: महाभूमी पोर्टलवरीलडिजिटल ७/१२ ला पूर्ण कार्यान्वित ठेवत असल्याबाबत जनजागृती करणे., कमी-जास्त पत्रकेः भूसंपादन व अकृषिक परवानी दिलेल्या प्रकरणांत 'कमी-जास्त पत्रके' तयार करून गाव नमुने अद्ययावत करणे बाबत शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल., इतर सेवाः सुधारणा व नागरी सुविधा, समाधान शिबिरामध्ये एक खिडकी सुविधा अंतर्गत आधार नोंदणी दुरुस्ती, ई-नामजारी, अंशांक, पी.एम. किसान व तक्रार निवारण कक्ष (जनता दरबार). असे आहेत. क्यूआर कोडयुक्त डिजिटल ७/१२ वितरण, ई-मोजणी, पीएम किसान सेवा आणि शेत रस्ते तसेच शिवरस्त्यांच्या तक्रारींचे निवारण तातडीने केले जाणार आहे. 'एक खिडकी' योजनेच्या माध्यमातून तत्काळ सेवा पुरवतानाच सामाजिक अर्थसहाय्य योजनेचे मंजुरी आदेश, घरांसाठी पट्टे वाटप आणि पात्र लाभार्थ्यांना मोफत ५ ब्रास वाळूचे वितरण देखील

करण्यात येईल. याशिवाय डिजिटल रेशनकार्ड वाटप, आधारकार्ड दुरुस्ती, निवडणूक ओळखपत्र नोंदणी, एसटी स्मार्ट कार्ड आणि जन्म-मृत्यू नोंदणी अशा विविध नागरी सेवांची उपलब्धता एकाच ठिकाणी करून देण्यात आली आहे. भूसंपादन व अकृषिक परवानग्यांच्या नोंदी अद्ययावत करून गाव दप्तर अद्यावतीकरण करण्यावरही या मोहिमेत भर दिला जाणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत वरीलप्रमाणे देण्यात येणाऱ्या सर्व सेवांचा लाभनागरिकांनी, शेतकरी आणि विद्यार्थ्यांनी आपल्या जवळच्या महसूल मंडळ स्तरावरील शिबिराची माहिती घेऊन या अभियानाचा जास्तीत जास्त लाभघ्यावा, आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी नागरिकांनी शिबीरात आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी केले आहे. कार्यक्रमाचे प्रस्ताविक नायब तहसीलदार परवीन पठाण तर सुत्रसंचलन प्रा. विक्रम धन्वे यांनी केले व आभार प्रदर्शन श्रीमती मुंडे मॅडम यांनी केले आहे.

## एका निमशासकीय प्रशिक्षण संस्थेतून नव विद्यार्थ्यांना आयएएस घडविणाऱ्या एका ध्येयवेड्या संचालकांची यशोगाथा

# आधुनिक द्रोणाचार्य : महादेव जगताप

**ठाणे** महानगरपालिकेच्या चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेचे संचालक मा. श्री महादेव जगताप यांनी नवा विक्रम स्थापन केला आहे. नुकत्याच काल परवा लागलेल्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या आयएएस या परीक्षेत त्यांनी चक्क नऊ मुलांना उत्तीर्ण करून दाखवून महाराष्ट्रासमोर नव्हे देशासमोर एक आदर्श ठेवला आहे .विशेष म्हणजे निकाल लागण्याच्या एक दिवस आधी मी त्यांना भेटलो तर त्यांनी माझी आठ नऊ मुले उद्या लागणाऱ्या आयएएसच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होणार आहेत असे ठामपणे सांगितले होते .हे ठामपणे सांगण्यामागे त्यांची तपश्चर्या होती हे वेगळे सांगणे न लगे.



एखाद्या निम शासकीय संस्थेतून नऊ मुले आयएएस होणे ही फार मोठी गोष्ट झाली. कारण खाजगी संस्था आणि शासकीय संस्था यामध्ये फरक असतो. तो फरक श्री महादेव जगताप यांनी भरून काढला आणि महाराष्ट्र समोर एक आदर्श ठेवला.

अशाच एका कार्यक्रमांमध्ये श्री महादेव जगताप यांची भेट झाली होती .त्यांनी मला चिंतामणराव देशमुख आयएएस अकादमीमध्ये ठाण्याला येण्याचे निमंत्रण दिले होते. एक दहा वर्षांपूर्वी मी जेव्हा या संस्थेला भेट दिली होती तेव्हा या संस्थेची परिस्थिती चांगली नव्हती .पण काल जेव्हा मी या चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेमध्ये भेट दिली तेव्हा मला अमुलाग्र बदल झालेला दिसला. मातीचे सोने झाले असा प्रकार दिसला आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे श्री महादेव जगताप यांचा लोकाभिमुख स्वभाव. अतिशय विनम्र पण ध्येय डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करणारा संचालक या शब्दात त्यांचे मूल्यांकन करावे लागेल. सुरुवातीची चिंतामणराव देशमुख प्रशासकीय संस्था आणि आताची संस्था यामध्ये जमीन अस्मानाचा फरक पडलेला आहे. संस्थेचा पूर्ण परिसर ग्रंथालय अभ्यासिका अतिथी कक्ष संचालक कक्ष ह्या खऱ्या अर्थाने बोलक्या व समृद्ध झालेल्या आहेत.

श्री महादेव जगताप यांचा अजून एक विशेष म्हणजे आम्ही ज्याप्रमाणे दुसऱ्या वर्गापासून आयएएसचे पुस्तके तयार केली त्याचप्रमाणे दुसऱ्या कोणी केली असेल असे मला वाटत नव्हते. पण काल जेव्हा मी या संस्थेला भेट दिली तेव्हा मला आश्चर्याचा धक्काच बसला. जगताप सरांनी पुढाकार घेऊन पाचव्या वर्गापासून बारावीपर्यंतची सर्व एनसीआरटीची पुस्तके विद्यार्थीमुख बनविली आहेत. खरं म्हणजे हे अवघड काम असतं .चिकट काम असतं. त्रासदायक काम असतं. पण म्हणतात ना जितनेवाले कोई अलग काम नही करते वे हर काम अलग ढंगसे करते है या न्यायाने त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून ही पुस्तके प्रसिद्ध केलेली आहेत. आणि त्याचा दर देखील फार माफक आहे.

मुंबईला माझे कार्यक्रम ठरले होते . सर्वप्रथम मी ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त व माझे अमरावतीकर मित्र श्री प्रशांत रोडे त्यांना भेटायला गेलो. माझ्याबरोबर माझे मित्र व जीवन संजीवनी चे संचालक श्री राजेश चव्हाण हे होते. त्यानंतर मी जगताप सरांना व्हाट्सअप वर मेसेज केला की मी मुंबईत आहे आपल्या संस्थेला भेट देणार आहे. त्यांच्या लगेच संदेश आला .आपले स्वागत आहे .

मी जेव्हा संस्थेमध्ये गेलो तेव्हा सरांना भेटायला दोन विधी महाविद्यालयाचे प्राचार्य आले होते. आमची खाजगी संस्था कशा कोचिंग करतात यावर चर्चा सुरू होते होती. त्या दोन प्राचार्यांनी त्यांची कशी फसवणूक झाली ते पण सांगितले. आम्ही जगताप सरांशी चर्चा सुरू केली. ते सांगत होते .एक एक धागा उलगडत होता .सर स्वतः आम्हाला संस्था दाखविण्यासाठी घेऊन गेले. प्रत्येक दालन हे आकर्षक नीटनेटके स्वच्छ व अभ्यासपूर्ण दिसले. सर्व मुले खऱ्या अर्थाने अभ्यासच करीत होती .एकही मुलगा अवांतर दिसला नाही.

ग्रंथालयाचा देखील कायापालट झालेला दिसला. ग्रंथालयामध्ये आयएएसला लागतात त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त पुस्तके आणि मोठ्या संख्येने त्या ठिकाणी दिसली .त्यांची मांडणी नीट केलेली दिसली. कुठेही विस्कळीतपणा आढळला नाही.

आता या संस्थेच्या विस्तारासाठी सरांनी दोन कक्ष अजून करायचे ठरविले आहेत. त्याचे काम देखील सुरू झालेलेआम्हाला दिसले. सर आम्हाला तिथे असलेल्या अतिथी कक्षात घेऊन गेले .आम्ही आतमध्ये प्रवेश करताच तिथे असलेले सर्व प्रशिक्षक ताडकन उठून उभे राहिले .आयएएसला शिकविणारे तज्ञ मार्गदर्शक इतक्या पटकन उभे राहतात हा आम्हाला आश्चर्याचा धक्का होता. सरांनी सर्वांचा परिचय करून दिला .आम्ही कक्षात परत आलो .

सरांनी अजून एक महत्त्वाची गोष्ट केलेली आहे ती म्हणजे फाउंडेशन कोर्स. बारावीनंतर जी मुले स्पर्धा परीक्षेला जाऊ इच्छितात त्यांच्यासाठी सरांनी फाउंडेशन कोर्स तयार केलेला आहे .बारावी झालेले मुले ते या फाउंडेशन कोर्सला प्रवेश घेऊ शकतात .हा अतिशय उत्तम उपक्रम आहे .आपल्याकडे मुले साधारणतः पदवी परीक्षा झाल्यानंतर या परीक्षेच्या तयारीला सुरुवात करतात आम्ही ती दुसऱ्या वर्गापासूनच केलेली आहे. पण ती प्राथमिक स्वरूपाची आहे .जगताप सरांनी मुलांमध्ये जिज्ञासा व त्यांनी जर बारावीपासून अभ्यासाला सुरुवात केली तर त्याला चांगले यश मिळू शकते हे लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून या फाउंडेशन कोर्सची आखणी केलेली आहे आणि हा उपक्रम खरोखरच अभिनंदन आणि अनुकरणीय आहे.

आमच्या सगळ्या कक्षांना भेटी देऊन झाल्या .ज्या ठिकाणी अतिथीची व्याख्याने होतात ते सभागृह देखील आम्ही पाहिले. अतिशय सुसज्ज ते दिसले. नुकत्याच त्या ठिकाणी सुप्रसिद्ध आयपीएस अधिकारी श्रीमती मोक्षदा पाटील ह्या मार्गदर्शनासाठी येऊन गेल्याचे कळले .आम्ही सरांच्या केबिनमध्ये परत आलो .सरांनी भला मोठा बुके व शाल माझ्यासाठी बोलावून ठेवले होते.

त्यांनी माझा चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेचे संचालक म्हणून माझ्या मिशन आयएएस कार्याचा गौरव म्हणून माझा सत्कार केला. मला खरंच गहिवरून आलं. एका निमशासकीय आयएएस प्रशिक्षण संस्थेमध्ये अशा प्रकारचा सत्कार होण्याची माझी ही पहिलीच वेळ होती.

मी सरांचे आभार मानले व जायला निघालो तर सर मला व श्री राजेश चव्हाण यांना अगदी संस्थेच्या प्रवेशद्वारापर्यंत सोडायला आले. ठाणे महानगरपालिकेच्या चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेचा संचालक आपली खुर्ची सोडून एखाद्या व्यक्तीला दारापर्यंत सोडायला येतो ही गोष्ट म्हणजे नमूद करण्यासारखी आहे. त्यातून जगतापसरांचे मोठेपण व आदरतिथ्य कसे असावे याचे दर्शन घडल्याशिवाय राहिले नाही. सरांनी माझ्यावर एक जबाबदारी पण टाकली .ते म्हणाले मोठ्या संख्येने आयएएस आयपीएस अधिकारी तुमच्या परिचयाचे आहेत. ते जर आमच्या संस्थेमध्ये येत राहिले आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत राहिले तर या संस्थेच्या विकासाला सोन्याची झालर लागल्यासारखे होईल .मी लगेच माझे जिवलग मित्र व आयएएस अधिकारी श्री विशाल नरवाडे यांना फोन लावला. त्यांनी फोनवरच संमती दिली आणि लगेच येत असल्याचे कळविले. या सर्वांमधून सरांची तळमळ मला दिसून येत होती.

सर म्हणाले उद्या आयएएसचा निकाल लागणार आहे. माझी आठ नऊ मुलं उद्याच्या निकालात नक्कीच आयएएस झालेली असतील. त्यांच्या बोलण्यामध्ये आत्मविश्वास होता. या आत्मविश्वासाला त्यांच्या तपश्चर्याची जोड होती.

काल जेव्हा निकाल लागला तेव्हा त्यांनी किती ठामपणे सांगितलेली गोष्ट प्रत्यक्षात उतरली याचा मला प्रत्यय आला. खरोखरच नऊ मुले त्यांच्या संस्थेतून आयएएसची परीक्षा पास झाले होते. हा निकाल नक्कीच फार आशावादी आहे. मी प्रवासात होतो .मी सरांना फोन केला. अभिनंदन केले .सरांनी लगेच मला सर्व मुलांचे फोटो .त्यांचे मोबाईल नंबर पाठविले. मी प्रवासात असताना त्या मुलांशी संपर्क साधला .प्रत्येक मुलगा जगताप सरांचेच नाव घेत होता आणि कृतज्ञता व्यक्त करीत होता.

असे जगताप सर महाराष्ट्रात असलेल्या प्रत्येक शासकीय आयएएस सेंटरला लाभले तर मला वाटते महाराष्ट्राचा आयएएसचा जो निकाल उत्तरोत्तर वाढत आहे त्याला चार चाँद लागल्याशिवाय राहणार नाहीत. जगतापसर आपण ठाणे महानगरपालिकेच्या चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेसाठी जे वाहून घेतले आहे त्याला मनापासून हृदयापासून प्रणाम.

**- प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे**
**संचालक, मिशन आयएएस, अमरावती कॅम्प**

# टोकवाडी येथे नाफेडचे थेट खरेदी केंद्र सुरू; तुरीला ८ हजार तर हरभऱ्याला ५८७५ हमीभाव

## शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा – ॲड . रणजीत विष्णुपंत सोळंके

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**





तुरीचे बाजारभाव सध्या कमी असल्याने शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा व त्यांना आर्थिक दिलासा मिळावा यासाठी केंद्र शासनाच्या आत्मनिर्भर भारत योजनेअंतर्गत नाफेडमार्फत तूर व हरभरा खरेदीसाठी टोकवाडी येथे खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे.

हे खरेदी केंद्र शेतकरी कापूस प्रक्रिया सहकारी संस्था, टोकवाडी येथे कार्यरत असून परिसरातील शेतकऱ्यांना नाफेडमार्फत हमीभावाने खरेदीची सुविधा उपलब्ध झाली आहे. या केंद्रावर तुरीचा दर ८,००० रुपये प्रति क्विंटल, तर हरभरा (चना) ५,८७५ रुपये प्रति क्विंटल असा जाहीर करण्यात आला आहे.

नाफेडचे हे डायरेक्ट खरेदी केंद्र असल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यावर सुमारे ३८ तासांच्या आत पेमेंट जमा होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पारदर्शक व्यवहारासह जलद पेमेंटची सुविधा उपलब्ध होणार आहे.

सध्या बाजारपेठेत तूर व हरभऱ्याला अपेक्षित दर मिळत नसल्याने या खरेदी केंद्रामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून शासकीय हमीभावाचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी टोकवाडी येथील नाफेड खरेदी केंद्रावर आपला तूर व हरभरा माल विक्रीसाठी आणून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन ॲड. रणजीत विष्णुपंत सोळंके, संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, परळी वैजनाथ यांनी केले आहे.

याशिवाय, शेतकऱ्यांनी आधार कार्ड व पेराची नोंद असलेला सातबारा उतारा सोबत घेऊन टोकवाडी येथील शेतकरी कापूस प्रक्रिया सहकारी संस्थेत तात्काळ नावनोंदणी करावी आणि त्यानंतर आपला शेतमाल खरेदी केंद्रावर आणून विक्री करावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.





# सुसंगत फौंडेशनतर्फे महिला दिनानिमित्त २० कर्तबगार महिलांचा सन्मान

पुणे : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त सुसंगत फौंडेशन, पुणे यांच्या वतीने महिलांचा सन्मान आणि गरजू महिलांना साडी वाटपाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. हा कार्यक्रम रविवार, दि. ८ मार्च २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता सदाशिव पेठ येथील वेदशास्त्रोतेजक सभागृह, सणस ग्राऊंडजवळ आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. उज्ज्वला दीक्षित उपस्थित होत्या, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. पल्लवी प्रसाद होत्या. अध्यक्षांच्या हस्ते डॉ. सुवर्णा कराड (प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ महिला आघाडी, महाराष्ट्र) यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण २० कर्तबगार महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी बोलताना प्रमुख पाहुण्या डॉ. उज्ज्वला दीक्षित यांनी महिलांना प्रेरणादायी संदेश देताना "स्वतः तरा आणि इतरांनाही तारून न्या" असे आवाहन केले. महिलांनी स्वतःच्या प्रगतीसोबत समाजातील इतर महिलांनाही सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सांगितले. तसेच मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत कुटुंबांनी आग्रही राहण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

कार्यक्रमात महिलांच्या आरोग्याबाबतही जागरूकता निर्माण करण्यात आली. अनेक महिला "मला काही होत नाही, मग तपासणी कशासाठी?" या मानसिकतेमुळे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात, ही प्रवृत्ती बदलण्याची गरज असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. या कार्यक्रमात दहा गरजू महिलांना साडी वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. सुधाकर न्हाळदे, श्री. धोंडीराम गडदे, डॉ. संयोगिता नाईक, ॲड. वैशाली करे, श्री. जयंत जोगळेकर व सौ. संगीता न्हाळदे यांनी केले. कार्यक्रमाला महिला व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# परळीत 'सिंघम स्टाईल' कारवाई : थरार ....!

# पाठलागानंतर अवैध वाळूचा हायवा जप्त; दुसरा पसार

## महसूल विभागाचतील काही कर्मचाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह? स्थानिकांमध्ये चर्चा

## पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक राठोड यांनी केली कारवाई






**परळी | प्रतिनिधी**

परळी शहर व परिसरात सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीवर परळी पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत थरारक पाठलागानंतर एक हायवा जप्त केला, तर दुसरा हायवा पळून जाण्यात यशस्वी ठरल्याची घटना समोर आली आहे. या कारवाईमुळे वाळू माफियांच्या गोटात मोठी खळबळ उडाली असून महसूल विभागाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

परळी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दीपक राठोड यांनी ही कारवाई केली. गंगाखेड मार्गावरून धर्मापुरी फाटा मागे वैजवाडी फाटा मार्गे परळी शहरात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.

या माहितीच्या आधारे पीएसआय दीपक राठोड यांनी आपल्या पथकासह कालरात्री देवी मंदिराजवळील परिसरात सापळा रचला. सायंकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास संशयास्पद दोन हायवा टिप्पर त्या मार्गाने येताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा इशारा दिला असता चालकांनी वाहनांसह पळून जाण्याचा प्रयत्न केला.

मात्र पीएसआय राठोड यांनी 'सिंघम स्टाईल'ने पाठलाग करत एक हायवा अडवण्यात यश मिळवले. पकडण्यात आलेल्या एमएच 26 बीई 1933 क्रमांकाच्या हायवामध्ये अंदाजे ६ ते ७ ब्रास वाळू विनापरवाना आढळून आली. वाहन चालकाकडे कोणतीही पावती अथवा कागदपत्रे नसल्याचेही बोलल जात आहे.

दरम्यान, या कारवाईदरम्यान दुसरा एमएच 44 यू 8801 क्रमांकाचा हायवा चालक वाहनासह पसार झाला. स्थानिक नागरिकांमध्ये अशी चर्चा सुरू आहे की, संबंधित हायवा एका मंडळ अधिकाऱ्याच्या सहकार्यामुळे पळून गेला आहे. त्यामुळे या प्रकरणात महसूल विभागाच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

सध्या जप्त करण्यात आलेला हायवा परळी पोलीस ठाण्यात जमा करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. तसेच पसार झालेल्या हायवाचा शोध घेण्याचे कामही पोलिसांकडून सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

दरम्यान, परळी परिसरात अवैध वाळू तस्करीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला असून प्रशासनाने या प्रकारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# लातूर ग्रामीण मधील पाच रस्ते आणि दोन पुलाच्या कामासाठी ३०.८० कोटीचा निधी

## लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नांना यश

**लातूर |** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध पाच रस्त्याच्या कामाबरोबरच दोन मोठ्या पुलाच्या बांधकामाकरिता लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून तब्बल ३० कोटी ८० लक्ष रुपयांच्या निधीची तरतूद राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. येत्या काळात पाचही रस्ते आणि पुलाचे काम होणार असल्याने त्या त्या भागातील नागरिकांतून समाधान व्यक्त केले जात आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध रस्त्याच्या आणि पुलाच्या कामांना निधी मिळावा यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस, जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी पाठपुरावा केला होता केलेल्या पाठपुराव्यानुसार मतदार संघातील पाच रस्त्याच्या कामाबरोबरच दोन मोठ्या पुलाच्या बांधकामाकरिता तब्बल ३० कोटी ८० लक्ष रुपयांच्या निधीची तरतूद राज्याच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या सुरू असलेल्या अधिवेशनात राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी शुक्रवारी शेतकऱ्यांच्या हिताबरोबरच ग्रामीण भागाच्या सर्वांगीण



विकासाला गती देणारा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील मुरुड ते पाडोळी रस्ता चार किलोमीटर सुधारणा करणे मुरुड गावात काँक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे ६ कोटी रुपये, कासारजवळा गातेगाव मुरुड अकोला ते भोयरा सावरगाव रस्ता सुधारणा करणे मुरुड अकोला गाव भाग काँक्रीट रस्ता करणे ३ कोटी ५० लक्ष, सलगरा बु. बोकनगाव बिंदगीहाळ ते तालुका सरहद्द दरम्यानच्या रस्त्याची पूल मोऱ्यासह सुधारणा करणे ७ कोटी, औसा तालुक्यातील आंदोरा ते भेटा दरम्यानच्या रस्त्याची दुरुस्ती ५ कोटी रुपये, रेनापुर तालुक्यातील जवळगा सेलू रामवाडी कुंभारवाडी रस्त्याची सुधारणा हारवाडी जवळगा सेलू दरम्यानच्या रस्त्याच्या कामासाठी ३ कोटी ५० लक्ष त्याचबरोबर लातूर तालुक्यातील रामेश्वर गावाजवळ प्रजिमा ९२ वर मोठ्या पुलाचे बांधकाम करणे २ कोटी ९० लक्ष, आणि भादा सर्कल मधील भेटा आंदोरा रोडवर लहान पुलाचे जोडरस्त्यासह बांधकाम करणे २ कोटी ९० लक्ष असे एकूण ३० कोटी ८० लक्ष रुपयाची तरतूद केली आहे.

गेल्या अनेक वर्षापासून वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या रस्त्याचे काम व्हावे अशी मागणी नागरिकांची होती आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून सदरील पाचही रस्ते कामाची दुरुस्ती आणि दोन रस्त्यावरील तीन लहान पुलाचे काम होणार असल्याने नागरिकातून समाधान व्यक्त केले जात आहे. या कामासाठी केलेल्या प्रयत्नाबद्दल आ. रमेशआप्पा कराड यांचे त्या त्या भागातील भाजपाच्या कार्यकर्त्यांसह नागरिकांनी आभार व्यक्त केले आहेत.

# सिरसाळा पोलीस ठाण्याचे एपीआय वादात; वकिलांबाबतच्या वक्तव्याचा व्हिडिओ व्हायरल

**बीड | प्रतिनिधी**

सिरसाळा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नागरिकांशी बोलताना केलेल्या वक्तव्यामुळे वाद निर्माण झाला आहे. संबंधित अधिकाऱ्याचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून त्यामध्ये त्यांनी वकिलांबाबत केलेल्या विधानांवरून वकील बांधवांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये संबंधित पोलीस अधिकारी नागरिकांशी संवाद साधताना, "वकील काय म्हणतो त्याला मी किंमत देत नाही" तसेच "वकिलाला पैसे दिले की तो तुमच्याच बाजूने बोलणार" अशा आशयाचे वक्तव्य करताना दिसत आहेत. या वक्तव्यामुळे वकिलांच्या व्यावसायिक प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याचा आरोप केला जात आहे.

कायद्याच्या क्षेत्रात काम करणाऱ्या वकिलांची अशा प्रकारे बदनामी करणे तसेच त्यांच्यावर सार्वजनिकरित्या आरोप करणे योग्य नसल्याची प्रतिक्रिया काही वकील बांधवांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, हा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून अनेकांनी त्यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.



या प्रकरणात संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी केलेल्या वक्तव्याबाबत पुढे काय भूमिका घेतली जाते, तसेच यावर वरिष्ठ पोलीस अधिकारी किंवा बार असोसिएशनकडून काही अधिकृत भूमिका मांडली जाते का, याकडे लक्ष लागले आहे.



# स्कॉलर केजी स्कूलमध्ये तिहेरी उपक्रमांनी महिला दिन उत्साहात साजरा

**परळी - विशेष बातमी**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त स्कॉलर केजी स्कूलमध्ये स्व-विकासाचा संवाद, पाककलेला वाव देणारी 'आनंद नगरी' आणि महिलांसाठी मोफत दंत तपासणी शिबिर अशा तिहेरी उपक्रमांनी महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सुरेखा बांगर तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रूपाली फड आणि प्रा. वंदना जगतकर उपस्थित होत्या. कार्यक्रमात उपस्थित महिलांमधून लकी ड्रॉ पद्धतीने व्यासपीठावर बसण्याची संधी सौ. पूनम भुतडा यांना मिळाली. सुरुवातीला विद्येची देवता सरस्वती आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

शाळेच्या प्राचार्या सौ. सुजाता फुटके यांनी प्रास्ताविकात यंदा प्रथमच महिला दिनानिमित्त 'आनंद नगरी' आणि मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे सांगत महिलांच्या आरोग्य आणि आनंदासाठी हा उपक्रम राबविल्याचा आनंद व्यक्त केला.

डॉ. रूपाली फड यांनी महिलांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये, असे आवाहन केले. तर डॉ. सुरेखा बांगर यांनी कर्तृत्ववान महिलांची उदाहरणे देत महिलांनी आत्मविश्वासाने पुढे जाण्याचा संदेश दिला. त्यांचा हसत-खेळत झालेला संवाद उपस्थित महिलांना विशेष भावला. प्रा. वंदना जगतकर यांनी 'आनंद नगरी'चे परीक्षण करत महिलांना सकस व पौष्टिक आहाराचे महत्त्वही पटवून दिले.

यावेळी पाहुण्यांच्या हस्ते 'आनंद नगरी' आणि मोफत दंत तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. आरोग्यास पोषक आणि चविष्ट अशा विविध पदार्थांची मेजवानी या आनंद नगरीत महिलांनी सादर केली. सुमारे दोन तास चाललेल्या या कार्यक्रमाचा परिसरातील महिला, पुरुष तसेच बालगोपाळांनी मनमुराद आनंद घेतला.

कार्यक्रमासाठी शाळेचे प्रांगण मंडप, रांगोळी, आकर्षक बॅनर, फुलांची सजावट आणि रंगीत फलकांनी दिमाखदार पद्धतीने सजवण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सौ. प्रमिला कदम यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्या सौ. सुजाता फुटके यांच्या मार्गदर्शनाखाली सौ. वर्षा लाड, सौ. प्रमिला कदम, सौ. राजश्री हलकंचे, सौ. संगीता रोकडे, सौ. ज्योती वळसे, सौ. रुचिता वाडे, सौ. अमृता मालेवार, सौ. सुनेना गुट्टे, सौ. अश्विनी मुंडे, सौ. वेणूताई तांदळे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच सौ. शोभा शांतलिंग फुटके यांनी परीक्षणासाठी प्रा. वंदना जगतकर यांना सहकार्य केले.

### पाककला स्पर्धेतील विजेते-

आनंद नगरी अंतर्गत आयोजित पाककला स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ. कल्पना सोळंके, द्वितीय सौ. योगिता नागरगोजे, तृतीय सौ. शुभांगी उदगीरकर यांनी पटकावला, तर उत्तेजनार्थ पुरस्कार सौ. मंगला सारस्वत यांना प्रदान करण्यात आला.

